<u>रे.मु.नं. २७६/२०१७</u>
पुजा **विरूध्द** विनायक
CNR No. MHPU13003064-2016

## <u>निशाणी क्रमांक ६८ वरील आदेश</u>

**वादीने सदरचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरूस्ती करण्यासाठी केलेला आहे. त्याचे कथन खालील प्रमाणे.**

**१.** सदर दावा दाखल करतेवेळी दाव्यात प्रतिवादी नं. ८ व ९ यांचा नावाचा चुकिचा उल्लेख झाला आहे. प्रतिवादी नं. ८ यांचे नाव श्री. विलास महादेव ठोंबरे असे लिहिले आहे. तर प्रतिवादी नं. ९ यांचे नाव श्री. मच्छिंद्र बाळासाहेब ढोकचौळे असे टाईप केले आहे. सदर चुक झाली असुन वादी यांना प्रतिवादी नं. ८ व ९ यांच्या नावाची पुढील प्रमाणे दुरुस्ती करावयाची आहे.

प्रतिवादी नं. ८. श्री. विलास माधव ठोंबरे

प्रतिवादी नं. ९. श्री. मच्छिंद्र बाबासाहेब ढोकचौळे

वरीलप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणे न्यायाचे कामी गरजेचे आहे.

वादी विनंती करतात की, अर्जात नमुद केल्याप्रमाणे प्रतिवादी नं. ८ व ९ यांच्या नावात दुरुस्ती करण्याची परवानगी मंजुर करण्यात यावी.

सदर अर्जावर प्रतिवादी क्र. १ याने त्याचे म्हणणे दिले असुन अर्ज मेंटेनेबल नसुन तो फेटाळावा असे म्हणले आहे.

**२.** दावा, दुरूस्ती अर्ज, दुरूस्ती अर्जाचे प्रतिज्ञापत्र वाचले व कागदपत्रांची पडताळणी केली.

**३.** वादींतर्फे श्री. विक्रम म्हेत्रे वकील व प्रतिवादीतर्फे श्री. सचिन कुदळे वकील यांचा युक्तीवाद ऐकला.

**४.** टंकलेखनाच्या चुकिमुळे दाव्यामध्ये प्रतिवादी नं. ८ व ९ यांचे चुकिचे नाव

लिहिले गेले आहे असे वादींचे म्हणणे आहे. सदर अर्जाद्वारे वादी प्रतिवादी क्र. ८ व ९ यांच्या नावात दुरुस्ती करु इच्छितात. सदरचा दावा हा वाटपासाठी दाखल केलेला आहे. त्यामुळे सर्व वाद प्रश्न निकाली काढण्यासाठी सर्व आवश्यक पक्षकारांना त्यांच्या योग्य नावाने दाव्यात सामील केले पाहिजे. नियोजित दुरूस्ती ही केवळ प्रतिवादींच्या नावामध्ये करावयाची असल्याने ती निव्वळ औपचारिक स्वरूपाची असुन वादीने दाव्यात दुरूस्ती केल्यास दाव्याचे मुळ स्वरूप बदलणार नाही. प्रतिवादींचे नाव दुरूस्त केले तर त्यांचे काहीच नुकसान होणार नाही. या सर्व बाबींचा विचार करता मी खालील प्रमाणे आदेश पारित करित आहे.

## आदेश

१. वादीचा अर्ज रूपये ५००/— खर्चावर मंजुर करण्यात येतो.

२. वादीने दोन आठवडयाचे आत दावा दुरूस्त करावा.

सासवड
दिनांक—०१/०१/२०१९

**(व्ही.बी.साळुंके)**
दिवाणी न्यायाधीश क. स्तर सासवड

CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for word as per original Judgment.

Name of Steno : M. D. SHIRODE, Stenographer (L.G.)

Court Name : V.B.Salunke
Judicial Magistrate First Class Saswad.

Date of Judgment : 01/01/2019

Judgment signed by presiding officer on : 01/01/2019

Judgment uploaded on : 02/01/2019